# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

# ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र

## राज्यस्तरीय निबंध आणि पोस्टर्स (भित्तीपत्रक) स्पर्धा

| | |
|---|---|
| **प्रथम पारितोषिक - रु. ३०००/-** | **द्वितीय पारितोषिक रु. २०००/-** |
| **तृतीय पारितोषिक - रु. १०००/-** | **उत्तेजनार्थ पारितोषिक रु. ५००/-** |

**निबंध व पोस्टर्स स्वीकारण्याची अंतिम तारीख : दि. ११.०१.२०२१**

**प्रस्तावना :**

कोरोना नामक वैश्विक संकटाचा सामना करत २०२० हे पूर्ण वर्ष निघून गेले, तरिहि अजून हे संकट टळलेले नाही. यापुढील काही काळ या संकटासोबत आपणा सर्वांना जगायच आहे. कोरोना नामक महामारी भारतात आली तेंव्हा तीचा प्रसार होऊ नये म्हणून भारतातही लॉकडाऊन सारखा पर्याय अवलंबिण्यात आला. त्यामुळे महागाई वाढली, अर्थव्यवस्था ढासळली, लोकांचे रोजगार गेले, बेरोजगारी वाढली, मजूरांना मोठ्या प्रमाणात स्थलांतर करावे लागले. या आणि अशा अनेक घटना कोरोनाच्या पार्श्वभूमीवर घडल्या आणि घडत आहेत. शिक्षण व्यवस्थेचे तर संपूर्ण स्वरुप बदलले. ऑनलाईन शिक्षण त्यासाठी लागणारे स्मार्टफोन, त्यासाठी आवश्यक इंटरनेट, त्यासाठी विशिष्ट कंपनीचे नेटवर्क, ग्रामीण भागात नेटवर्कची समस्या यासर्वच बाबी अत्यंत क्लिष्ट व सर्वसामान्यांसाठी महागड्या ठरत आहेत.

या संपुर्ण घटनांचा परिणाम हा देशातील महिलांवर देखील मोठ्या प्रमाणात झाला. भारताच्या राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण विभागात आणि विविध राज्यातील जिल्हा पातळीवरील पोलीस मुख्यालयांत स्त्रियांविरोधी हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ झाल्याची आकडेवारी समोर आली. लॉकडाऊनच्या काळात घरीच सलोख्याने राहत असलेली व दिसून येणारी जनता हा एक भाग असला तरि त्याची दुसरी बाजू स्त्रियांवरील वाढलेल्या अत्याचाराची आहे, मजूरी करणाऱ्या स्त्रियांच्या हाल अपेष्टांची आहे, त्यांच्या मोठ्या प्रमाणावर झालेल्या स्थलांतराची आहे, हातावर पोट असणाऱ्या दैनंदिन कामकाजी स्त्रियांची आहे. तसेच याच जोडीला भारतात पडलेला ओला दुष्काळ हा स्त्रियांसाठीही नवीन संकटाचा आहे.

या सबंध पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी अभिव्यक्त व्हावे या दृष्टिकोनातून ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ द्वारा राज्यस्तरीय निबंध आणि पोस्टर्स (भित्तीपत्रक) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये विद्यार्थ्यांनी सक्रियपणे आपला सहभाग नोंदवावा.

## निबंध आणि पोस्टर्स (भित्तीपत्रक) स्पर्धेचे विषय :

१. कोविडजन्य परिस्थिती आणि विधवा, परित्यक्त्या, एकल स्त्रिया
२. लॉकडाऊनमधील स्त्रियांचे आरोग्याचे प्रश्न
३. ऑनलाईन शिक्षण पद्धती आणि मुलींवर होणारा परिणाम
४. कोविड आणि सामाजिक सौहार्द
५. आशावर्कर/आरोग्यसेविका आणि महिला पोलीस कोवीड योद्धा
६. कोरोना आणि स्त्रियांवर वाढलेला हिंसाचार
७. कोरोना, स्थलांतर आणि स्त्रिया
८. कोरोना, शासकीय नियोजन आणि स्त्रिया
९. कोरोना व ओल्या दुष्काळाचे स्त्रियांवरील परिणाम
१०. कोरोनोत्तर समाज आणि स्त्रिया
११. असंघटित क्षेत्रातील स्त्रियांचे प्रश्न

## स्पर्धेचे नियम :

१. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी/विद्यार्थिनी या स्पर्धेत सहभाग घेवू शकतात. इच्छूक विद्यार्थी/विद्यार्थीनीस एकाचवेळी दोन्हीही स्पर्धेत सहभाग घेता येईल.
२. स्पर्धेसाठी दिलेल्या विषयांपैकीच एक विषय निवडावा लागेल अन्य विषय स्वीकारले जाणार नाही. विजेते विद्यार्थी निवडण्याचा अंतिम अधिकार परीक्षकांना असेल.
३. निबंध व पोस्टर्सवर आपले नाव, वर्ग, महाविद्यालयाचे नाव, मोबाईल क्रं., ईमेल आयडी टाकल्याची खात्री करावी.
४. निबंध शब्द मर्यादा – ३००० शब्द, पोस्टर साईझ – **A2 / A1**
५. निबंध व पोस्टर्स खालील दिलेल्या पत्यावर (निबंध *event.tswsc@gmail.com* या ईमेल आयडीवरही पाठवू शकता) दि. ११ जोनवारी २०२१ पर्यंत पाठवून स्पर्धेत सहभागी होता येईल. नमूद दिनांकानंतर स्पर्धेत सहभाग नोंदवता येणार नाही.
६. सर्व स्पर्धक विद्यार्थ्यांना डिजिटल प्रमाणपत्र देण्यात येतील.

**विनीत**

डॉ. सविता बहिरट
समन्वयक
ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र
मो. 8605495760

डॉ. निर्मला जाधव
संचालक
ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र

**संपर्कासाठी पत्ता :**

संचालक, ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र
विद्यापीठ मध्यवर्ती ग्रंथालयाशेजारी (ज्ञानस्त्रोत केंद्र)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद- ४३१००४
**E-mail:** event.tswsc@gmail.com